**महत्वाचे परिपत्रक**

जा.क्रं/सुकृऔ/दर नि./२०१६-१७/ ६५ /गुनि-५/२०१७
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ४११ ००१,
दिनांक : /०२/२०१७.
02/03/2017

प्रति,

१. **विभागीय कृषि सहसंचालक --------------------(सर्व)**

२. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी ---------------- (सर्व)**

३. **कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, ------------- (सर्व)**

**विषय : सन २०१६-१७ करीता विविध केंद्र व राज्य पुरस्कृत योजनांतर्गत ट्रॅक्टर, पीव्हीसी पाईप व दाल मिलचा अनुदानावर पुरवठा करण्याबाबत**

**संदर्भ** : १. शासन निर्णय क्र.सुकृऔ -२०१५/प्र.क्र.२१८/११अे, दिनांक २३/११/२०१५
२. आयुक्तालयाचे पत्र जा क्र.सुकृऔ/दरनि/२०१६-१७/४९३/गुनि-५/२०१६/ पीव्हीसी, दि.०६/१२/२०१६
३. म.कृ.उ.वि.म. यांचे पत्र सं.क्र.कृअ/ट्रॅक्टर किंमती/२०१५/ दिनांक ९/५/२०१६
४. कृषि आयुक्तालयाच्या मा.सू./जा क्र/कृयांउअ/गुनि-५/मा.सू२०१६-१७/२९८/२०१६, दि.२७/०६/२०१६
५. शासनाच्या नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र. डीसीटी-२३१६/प्र.क्र.१३३/का-१४१७, दि. ५/१२/२०१६
६. कृषि व प.दु.म. विभागाचा शासन निर्णय क्र.सुकृऔ -२०१६/प्र.क्र.३०१/११अे, दि.२१/०१/२०१७
७. आयुक्तालयाचे पत्र जा क्र.सुकृऔ/दरनि/२०१६-१७/२७/गुनि-५/२०१७, दि.२७/१/२०१७

शासनाच्या नियोजन विभागाचा शासन निर्णय दिनांक ५/१२/२०१६ च्या अनुषंगाने कृषि व प.दु.म. विभागाचा शासन निर्णय दिनांक २१/०१/२०१७ अन्वये कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर वितरीत करावयाच्या कृषि औजारांचे अनुदान थेट शेतक-यांच्या बॅन्क खात्यात जमा करण्याबाबत कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने आयुक्तालयाच्या संदर्भीय दि. २७/१/२०१७ च्या पत्रान्वये सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्याबाबत पी.व्ही.सी. पाईप्स, डबल रोलर मिनी दालमील, ट्रॅक्टर यांचेबाबत व खुल्या बाजारातील खरेदीबाबत कार्यपध्दतीतील सुधारणा खालीलप्रमाणे राहील.

**१. पीव्हीसी पाईप :** विविध केंद्र /राज्य पुरस्कृत योजनांतर्गत अनुदानावर पीव्हीसी पाईपचा पुरवठा करण्यात येतो. कृषि व प.दु.म. विभागाचे शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.२०१३/प्र.क्र.६३/११ अे, दिनांक ५/११/२०१५ मधील मुद्दा क्र. ७ अन्वये “महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळाकरीता ज्या वस्तु राखून ठेवलेल्या आहेत त्याचा पुरवठा सदर महामंडळाकडून करण्यात येईल अशी तरतूद आहे”. त्यामुळे पीव्हीसी पाईपचे दर निश्चित केलेले नाहीत. तथापी, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळाने सन २०१५-१६ पासून पी.व्ही.सी. पाईपचे दरकरार केलेले नाहीत.

शासनाच्या नियोजन विभागाचा संदर्भीय शासन निर्णय दिनांक ५/१२/२०१६ व कृषि विभागाचा संदर्भीय शासन निर्णय दिनांक २१/०१/२०१७ च्या अनुषंगाने डि.बी.टी. तत्वानुसार लाभार्थ्यांनी पूर्वसंमती घेवून आयएसआय मार्कचे पीव्हीसी पाईप्सची त्यांच्या पसंतीने खुल्या बाजारातून खरेदी करावी. लाभधारकाने योजनांतर्गत अनुदान लाभासाठी खुल्या बाजारातून पीव्हीसी पाईप खरेदी करताना त्यांचा दर्जा व स्पेसिफिकेशन्स आय एस क्रमांक IS:4985/2000 प्रमाणे असणे व उत्पादनास आय.एस.आय. मार्क असणे बंधनकारक राहील. महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळाने मागील वर्षी केलेल्या दर करारातील दरांआधारे किंवा योजनांतर्गत उच्चतम अनुदान मर्यादा यापैकी किमान दराप्रमाणे अनुदान लाभधारकास अनुज्ञेय राहील.

**२. डबल रोलर मिनी दालमिल** - संदर्भीय शासन निर्णय दिनांक २३/११/२०१५ अन्वये डबल रोलर मिनी दालमिलचे दर निश्चित करण्यात आले आहेत. तथापि, उत्पादकांनी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाशी करार केला नसल्याने त्यांचेमार्फत सद्यस्थितीत डबल रोलर दालमिलचा पुरवठा होत नाही. संदर्भीय शासन निर्णय दि. २१/१/२०१७ नुसार लाभधारकास पूर्वसंमती घेवून त्यांच्या पसंतीने खुल्या बाजारातून खरेदीची मुभा असल्याने विविध केंद्र/राज्य

पुरस्कृत योजनेंतर्गत डबल रोलर मिनी दालमिलबाबत लाभधारकास अनुदानाचा लाभ देताना संदर्भीय शासन निर्णय दिनांक २३/११/२०१५ मधील टेक्नीकल स्पेसिफिकेशन्स प्रमाणे स्पेसिफिकेशन्स असलेल्या डबल रोलर मिनी दाल मिलची खुल्या बाजारातून थेट खरेदी करण्यास हरकत नाही. शासन निर्णय दिनांक २३/११/२०१५ नुसार निश्चित दराप्रमाणे अथवा योजनांतर्गत उच्चतम अनुदान मर्यादा यापैकी किमाननुसार अनुदान अनुज्ञेय राहील.

**३. ट्रॅक्टर -** केंद्र शासनाच्या सुचनांनुसार त्यांच्या संकेतस्थळावर अनुदानास पात्र ट्रॅक्टर मॉडेल्सच्या प्रसिध्द केलेल्या यादीतील ट्रॅक्टर मॉडेल्सच अनुदानास पात्र राहतात. प्रचलीत पध्द्तीनुसार ट्रॅक्टरचे दर महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडून निश्चित करण्यात येतात. महामंडळाने संदर्भिय पत्र दिनांक ९/५/२०१६ अन्वये महामंडळाचे ट्रॅक्टरचे दर त्यांच्या विभागीय कार्यालयांना कळविले आहेत. आयुक्तालयाच्या संदर्भिय मार्गदर्शक सुचना दि. २७/६/२०१६ नुसार केंद्र शासनाने मान्यता दिलेल्या ट्रॅक्टर्स मॉडेलनाच अनुदान अनुज्ञेय असल्याचे कळविले आहे. सुलभतेच्या दृष्टीने केंद्र शासनाने अनुदानास पात्र घोषित केलेल्या ट्रॅक्टर्सची यादी आयुक्तालयाचे पत्र क्र.सुकृऔ/दर.नि./भाग-६/१५-१६/४५५/गुनि-५/२०१६, दि.८/११/२०१६ अन्वये निर्गमीत करण्यात आली आहे. सदर यादी केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर (http://farmech.dac gov.in) व कृषि विभागाच्या www. mahaagri.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. संदर्भीय शासन निर्णय दि. २१/१/२०१७ नुसार लाभधारकास त्यांच्या पसंतीने खुल्या बाजारातून खरेदीची मुभा असल्याने केंद्र शासनाने शिफारस केलेल्या मॉडेल्स/मेकच्या ट्रॅक्टरची पूर्वसंमती घेवून खरेदी खुल्या बाजारातून करता येईल. महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाने निश्चित केलेल्या दरांनुसार अथवा योजनांतर्गत उच्चतम अनुदान मर्यादा यापैकी किमाननुसार अनुदान अनुज्ञेय राहील.

**<u>खुल्या बाजारातील खरेदीबाबत कार्यपध्दतीमध्ये सुधारणा</u> -**

आयुक्तालयाच्या संदर्भीय दि. २७/१/२०१७ चे पत्रातील शेवटून दुस-या परिच्छेद खालील प्रमाणे वाचावा,

"प्रस्तुत कार्यपध्द्तीप्रमाणे लाभधारकाने खुल्या बाजारातून थेट औजारे खरेदी करताना ती भारतीय मानक संस्थेचे मानांकन प्राप्त असावीत (आय.एस. स्पेसिफिकेशन्स प्रमाणे) अथवा किमान शासन निर्णय दि. २३/११/२०१५ मध्ये नमुद केलेल्या औजारांचे तांत्रीक निकषांनुसार असणे बंधनकारक राहील." त्यानुसार लाभधारकांना पूर्वसंमतीने त्यांच्या पसंतीने खुल्या बाजारातून औजारे खरेदीची मुभा राहील. तसेच दिनांक ३१/०३/२०१७ पर्यंत सध्याच्या दर करारातील दर लागू राहतील.

उपरोक्त सुचना दिनांक ३१/०३/२०१७ पर्यंत लागू राहतील याची दक्षता घ्यावी. सदर पत्र कृषि विभागाच्या www.mahaagri.gov.in या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात येत आहे.

**(व्ही. बी. इंगळे)**
**कृषि संचालक (नि. व गु. नि.)**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे**

**प्रत -**

१. **मा. प्रधान सचिव (कृषि),** कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई -३२.
- यांना माहीतीस्तव सविनय सादर.

२. **श्री. श. बा. पावसकर, अवर सचिव,** ११ अे, कृषि व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
- यांना माहीतीस्तव.

३. **व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ,** मुंबई - ६५
- यांना माहीतीस्तव सादर.

४. **कृषि संचालक (सर्व),** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - यांना माहीती व तात्काळ कार्यवाहीस्तव.